# ग्रामीण बचतगटांच्या महिला निघाल्या अमेरिकेला...

## वारली उत्पादने, हस्तकलांचे होणार अमेरिकेत प्रदर्शन

**मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी):** ग्रामीण बचतगटांच्या महिलांद्वारे उत्पादित वस्तूंचे आता थेट अमेरिकेत प्रदर्शन होणार आहे. यामध्ये वारली उत्पादने, हस्तकला उत्पादने, महाराष्ट्राची वैशिष्ट्य असलेली वस्त्र उत्पादने, खाद्यसंस्कृती, हातमाग आदींचा समावेश असेल. यासाठी ग्रामविकासमंत्री पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण बचतगटांच्या महिला अमेरिकेला जाणार असून त्या तेथील एमआयटी, स्टॅनफोर्ड विद्यापीठ, टीआयई चार्टर, फेसबुकसारख्या विविध नामवंत संस्थांना भेटी देऊन जागतिक स्तरावरील उद्योजकतेचीही माहिती घेणार आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) आणि फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री (फिक्की) मार्फत या दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दौऱ्यात महिला बोस्टन, न्युयॉर्क, सॅनफ्रान्सिस्को या शहरांना भेटी देणार आहे.

राज्यातील बचतगटाची चळवळ ही आता फक्त बचतीपुरती मर्यादित राहिली नसून, या चळवळीतून अनेक महिला लघुउद्योजक पुढे येत आहेत. अनेक महिला बचतगट वेगवेगळ्या प्रकारचे लघुउद्योग यशस्वीरित्या चालवित आहेत. त्यापैकी १०० बचतगटांच्या उद्योजकतेला आम्ही महाअस्मिता नाविन्यपूर्ण 'उपजीविका गतिवर्धन' कार्यक्रमातून चालना देत असल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या.

या लघुउद्योजक महिला बचतगटांना उद्योजकतेचे आधुनिक प्रशिक्षण देणे, त्यांना देशांतर्गत आणि जागतिक बाजारपेठेची माहिती करून देणे अशी काही या अभियानाची उद्दिष्ट्ये आहेत. या अभियानांतर्गत फिक्कीच्या सहयोगाने अमेरिका दौऱ्याचे आयोजन करण्यात आल्याचे त्या म्हणाल्या.

### एमआयटी, फेसबुकलाही भेट देणार

या महिला अमेरिकेतील एमआयटी, स्टॅनफोर्ड विद्यापीठ, फेसबुक आदी संस्थांना भेट देणार आहे. तेथील लघुउद्योग क्षेत्रातील यशस्वी आणि प्रभावी व्यक्ती, संशोधक, गुंतवणूकदार, उद्योग क्षेत्रातील धोरणकर्ते, टीआयई चार्टरचे सदस्य यांच्या भेटी घेऊन लघुउद्योग आणि गुंतवणूक याबाबतीत चर्चादेखील केली जाणार आहे. महाराष्ट्रातील वारली उत्पादने, हस्तकला उत्पादने, महाराष्ट्राची वैशिष्ट्य असलेली वस्त्र उत्पादने, खाद्यसंस्कृती, हातमाग उत्पादने आदींविषयक अमेरिकेतील नागरिकांना विशेष आकर्षण आहे. याचा उपयोग महाराष्ट्रातील बचतगटांच्या उद्योजकतेला चालना देण्यासाठी कशा पद्धतीने करता येईल, याविषयी या दौऱ्यात आदानप्रदान आणि चर्चा केली जाणार आहे.

# 'समाज विषमतामुक्तीकडे जाणे आवश्यक'



**मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी) :** ''आर्थिक प्रगतीबरोबर समाजाला विषमतामुक्तीकडे घेऊन जाणे गरजेचे आहे. विकासाची फळे समाजातील सर्वस्तरात सारखी वितरीत होतात किंवा नाही हे पाहणेदेखील महत्त्वाचे आहे,'' असे मत अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले. आयआयटी पवईत नुकत्याच पार पडलेल्या अलंकार-ग्लोबल लीडरशिप समिटमध्ये ते बोलत होते.

'' ज्ञानसंपन्न युवक त्यांच्या बदललेल्या विचारांमधून, कृतींमधून ना केवळ स्वत: पुढे जाणार आहेत. परंतु, त्यांचे गाव, जिल्हा, राज्य आणि देशालाही पुढे घेऊन जाणार आहेत,'' असे मुनगंटीवार यावेळी म्हणाले. अर्थशास्त्राच्या सिद्धांतानुसार, स्थूल राज्य उत्पन्न, सकल राष्ट्रीय उत्पन्न, दरडोई उत्पन्न, विकास दर यावरून देशाची प्रगती ठरते. पण आजही आपल्या एका देशात तीन भारत राहतात. हिंदुस्थान, इंडिया आणि भारत यांच्यातील दरी सांधायची असेल, तर विषमतामुक्त देशाची निर्मिती व्हायला हवी. तशी व्यवस्था निर्माण करायला हवी,'' असेही त्यांनी नमूद केले.

केंद्र आणि राज्य शासनाने तशी पावले टाकली असल्याचे सांगून ते म्हणाले की, '' मुद्रा कर्ज असेल, स्टार्टअप, स्टॅंडअप सारख्या योजना असतील, कौशल्य विकासाची कामे असतील, मेक इन इंडिया, मेक इन महाराष्ट्रसारखे नावीन्यपूर्ण उपक्रम असतील यातून हे प्रयत्न वेग घेताना दिसत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तर झिरो इफेक्ट, झिरो डिफेक्ट आणि झिरो इम्पोर्टचा संकल्प जाहीर केला आहे. यात पर्यावरणस्नेही विकासाबरोबर स्वावलंबी, रोजगारक्षम भारताची बीजे रोवली गेली आहेत. ही व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी युवकांचा सहभाग खूप मोलाचा ठरणार असून, यासाठी करण्यात येणारे चिंतन, चर्चाही खूप महत्त्वाची आहे,'' असे ते म्हणाले.

# म्हाडाचा अतिक्रमण निष्कासन विभाग सुरू करणार : मधू चव्हाण



**मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी) :** म्हाडा वसाहतीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली असून, त्यामुळे म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासात अडथळा येत आहे. आता म्हाडाला नियोजन प्राधिकरणाचा दर्जा असून अतिक्रमणावर कारवाई करण्याचे अधिकार म्हाडाकडे आल्याने लवकरच म्हाडाचा अतिक्रमण निष्कासन विभाग तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे सध्या या अतिक्रमणांवर पालिकेकडून कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती म्हाडाच्या मुंबई मंडळाचे सभापती मधू चव्हाण यांनी दिली.

म्हाडाच्या ५६ वसाहतीत मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. मात्र, म्हाडाकडे अतिक्रमण निष्कासन विभाग नसल्याने या अनधिकृत बांधकावर पालिकेकडून कारवाई करण्यात येत होती. आता म्हाडा नियोजन प्राधिकरण झाल्यामुळे या वाढीव अतिक्रमणावर कारवाईचे सर्व अधिकार म्हाडाकडे आले आहेत. आता नव्याने अतिक्रमण विभाग सुरू करण्याचे आदेश मुंबई मंडळाचे मुख्यधिकारी यांना दिले असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. येत्या दोन महिन्यांत अतिक्रमण निष्कासन विभाग सुरू करण्यात येणार असून तोपर्यंत या अतिक्रमणांवर पालिकेकडून कारवाई करण्यात येणार असल्याचे चव्हाण म्हणाले.

# 'द ग्रेट गेम : १९१७' आणि 'बिटकॉईन' पुस्तकांचा प्रकाशन सोहळा




**मुंबई, दि. २७ (प्रतिनिधी):** जयराज साळगावकर लिखित 'द ग्रेट गेम : १९१७' आणि 'बिटकॉईन' ही दोन पुस्तके रविवार दि. २८ ऑक्टोबर रोजी प्रकाशित होणार आहेत. दरम्यान, या प्रकाशन सोहळ्याला खा. कुमार केतकर, खा. नरेंद्र जाधव, संदीप वासलेकर आणि ज्येष्ठ पत्रकार उदय निरगुडकर हे मान्यवर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत.

१६व्या आणि १७व्या शतकात ओटोमान साम्राज्याने जवळपास जग व्यापले होते. भूमध्य समुद्राच्या परिसरात पसरलेल्या या साम्राज्याचे वैभव हेवा वाटावे, असेच होते. परंतु अजेय पदावर पोहोचल्यानंतर शैथिल्य अंगी आलेल्या ओटोमान साम्राज्याचा फ्रान्स आणि इंग्लंड या देशांनी पराभव केला आणि जन्माला आली सौदी अरेबिया, इस्रायल, जॉर्डन, सीरिया, इराक, इराण आणि लेबनॉन ही सात नवी राष्ट्रे. इतिहासाचा हा सारीपाट 'द ग्रेट गेम : १९१७' या पुस्तकातून मांडण्यात आला आहे, तर जगाच्या अर्थव्यवस्थेवर हुकूमत गाजवणाऱ्या डॉलरला आव्हान देत नव्याने प्रस्थापित होणाऱ्या 'बिटकॉईन' या क्रिप्टोकरन्सीची मुद्देसूद ओळख 'बिटकॉईन' या पुस्तकातून करून देण्यात आली आहे. 'परम मित्र पब्लिकेशन्स'तर्फे ही दोन्ही पुस्तके प्रकाशित होत होणार असून हा प्रकाशन सोहळा रविवार, २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.०० वाजता राजर्षी शाहू सभागृह, शिवाजी मंदिर, दादर येथे आयोजित करण्यात आला आहे.

## घुसखोरी थांबवा, अन्यथा अनेक पर्याय उपलब्ध

**(पान १ वरुन)** झाले होते. बीआरओच्या पथकाला संरक्षण देण्यासाठी सैन्याला तैनात करण्यात आले होते. यावेळीच या जवानांवर दगडफेक करण्यात आली. यावर तीव्र नाराजी व्यक्त करत रावत म्हणाले की, '' त्यात आपला एक जवान शहीद झाला तरी, काही व्यक्ती म्हणतात की दगडफेक करणाऱ्यांना दहशतवाद्यांसारखी वागणूक देऊ नका.'' या प्रकरणी प्राथमिक माहिती अहवाल दाखल केला आहे.

## कासकरची व्हीआयपी वागणूक पोलिसांना भोवली

**(पान १ वरुन)** त्याला ठाणे कारागृहातून रुग्णालयापर्यंत नेणारे पोलीस कर्मचारी यासाठी जबाबदार असल्याचा निष्कर्ष काढत निलंबनाची कारवाई केली. अधिक चौकशीदरम्यान रोहिदास पवार आणि इतर कर्मचाऱ्यांनी कासकरला विशेष वागणूक दिल्याचे समोर आले. दरम्यान, सहपोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनीदेखील पाच पोलीस कर्मचाऱ्यांवर करण्यात आलेल्या निलंबनाच्या कारवाईच्या वृत्ताला दुजोरा दिला.

## गोन्साल्विस, परेराला ६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी

**(पान १ वरुन)** व्यवहारांमध्ये या गुन्ह्याच्या अनुषंगाने काही आर्थिक उलाढाली झाल्या आहेत का? आणि आरोपींचे फेसबुक, ई-मेल, सीडीआर यांचा तपास करायचा असल्याचे जिल्हा सरकारी वकील उज्वला पवार यांनी न्यायालयाला सांगितले. तसेच १४ दिवसांची पोलीस कोठडी देण्याची मागणीही न्यायालयाकडे केली. तर नजरकैदेची मुदत संपण्यापूर्वीच आरोपींना अटक करण्यात आली. त्यामुळे हा न्यायालयाचा अवमान असून पोलिसांनी ज्या कारणांसाठी पोलीस कोठडी मागितली आहे, त्याच्या तपास करण्यासाठी त्यांच्याकडे दोन महिन्यांचा कालावधी होता. आरोपींकडून बँक खात्याची चौकशी करण्याऐवजी बँकांकडूनच त्यांच्या खात्यांची चौकशी करण्याचा युक्तिवाद ॲड. सिद्धार्थ पाटील यांनी केला.

### सुधा भारद्वाजही न्यायालयात हजर

नक्षलवादी संघटनांशी संबंध असल्याच्या संशयावरून अटक करण्यात आलेल्या सुधा भारद्वाज यांना शनिवारी पुणे न्यायालयात हजर करण्यात आले आहे. त्यांना १४ दिवसांची पोलीस कोठडी मिळावी, अशी मागणी सरकारी वकील उज्वला पवार यांनी न्यायालयाकडे केली. तसेच काश्मीरमध्ये निर्माण झालेला कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न इतर राज्यात निर्माण करण्याचा सुधा भारद्वाज यांचा प्रयत्न होता. संघटनेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना कुठे पाठवायचे, याची माहिती त्यांच्याकडे असल्याचेही त्यांनी न्यायालयाला सांगितले. पुणे पोलिसांनी शनिवारी सकाळी हरियाणामधील फरियादाबाद येथील त्यांच्या निवासस्थानावरून त्यांना ताब्यात घेतले होते.

## 'सेव्ह शिखरजी'चे यशाच्या दिशेने पाऊल

**मुंबई :** पवित्र शिखरजी हिलला धार्मिक स्थळ म्हणून मान्यता देण्यासाठी सुरू असलेल्या 'सेव्ह शिखर'जी मोहिमेने आपल्या लक्ष्याच्या दिशेने पाऊल टाकले आहे. नुकतेच या मोहिमेच्या सदस्यांनी जैन धर्मियांसह झारखंडचे मुख्यमंत्री रघुबर दास यांची भेट घेतली. चर्चे अंती राज्य सरकारने मोठे पाऊल उचलत या हिलला जगातील एक पवित्र स्थळ म्हणून मान्यता देणारे एक कार्यालयीन परिपत्रक जारी केले. दरम्यान, संपूर्ण टेकडीला जैन धर्मियांचे पवित्र धार्मिक स्थळ म्हणून मान्यता देण्यासाठी सरकार कार्यवाही करेल, अशी आशा यावेळी सदस्यांकडून व्यक्त करण्यात आली.

## पालन करता येईल असेच निर्णय न्यायालयाने द्यावेत

**(पान १ वरुन)** पूजा केली आहे,'' असेही ते म्हणाले. ''देशभरातील अनेक मंदिरांत वेगवेगळ्या परंपरांचे पालन केले जाते. भगवान अयप्पांचीही अनेक मंदिरे देशात असून, तिथे महिलांना प्रवेश नाकारण्यात आलेला नाही. या मंदिरात अयप्पाची ब्रह्मचारी मूर्ती आहे. त्यामुळेच महिलांना प्रवेश नाकारला जातो. देशातील अनेक मंदिरे अशी आहेत की, जिथे केवळ महिलांनाच प्रवेश दिला जातो, पुरुषांना प्रवेश दिला जात नाही. मात्र, सर्वजण शबरीमलाच्याच निर्णयामागे लागले आहेत,'' अशी टीकाही त्यांनी केली.

## आज मध्य आणि ट्रान्स हार्बरवर मेगाब्लॉक

**मुंबई :** रविवारी मध्य आणि ट्रान्स हार्बर मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार असून पश्चिम आणि हार्बर मार्गावर रविवारी मेगाब्लॉक घेण्यात येणार नाही. मध्य आणि ट्रान्स हार्बर मार्गावर सकाळी ११.१५ ते दुपारी ३.४५ या कालावधीत दुरूस्तीची कामे करण्यात येणार आहेत, तर पश्चिम आणि हार्बर रेल्वेवर शनिवारी रात्रीच ब्लॉक घेण्यात येणार असल्याने रविवारी रेल्वे सेवा सुरळीत सुरू राहणार आहे.

मध्य रेल्वेवर रविवारी मुलुंड ते माटुंगा अप जलद मार्गावर सकाळी ११.१५ ते दुपारी ३.४५ पर्यंत मेगाब्लॉक असेल.


**इन्नोवसिंथ इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय :** सदनिका क्र. सी-२/३, केएमसी क्र. ९१, इन्नोवसिंथ कॉलनी, खोपोली - ४१०२०३, महाराष्ट्र, भारत
**CIN: L67120MH2008PLC178923 दूरध्वनी :** +९१-२१९२-२६०१००, २६२२२४
**वेबसाईट:** www.innovassynthinvestments.in **फॅक्स :** +९१-२१९२-२६३६२८
**ई-मेल:** secretarial@innovassynthinvestments.in

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येते की, सोमवार दि. ०५ नोव्हेंबर, २०१८ रोजी कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक इतर बाबींसोबतच दि. ३० सप्टेंबर, २०१८ रोजी संपलेल्या त्रैमासिकाकरिता अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष विचारात घेण्याकरिता आणि मंजूर करण्याकरिता घेण्यात येणार आहे. संचालक मंडळाच्या बैठकीची सूचना www.innovassynthinvestments.in आणि www.bseindia.com येथेही उपलब्ध आहे.

**इन्नोवसिंथ इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड करिता**
**सही/-**
**ठिकाण: खोपोली** **अभिषेक देशपांडे**
**दिनांक: २७ ऑक्टोबर, २०१८** **कंपनी सचिव आणि मान्यता अधिकारी**



**केनरा बैंक Canara Bank**
(A Government of India Undertaking)
**विशेषज्ञ मिड कॉर्पोरेट शाखा**
मुंबई फोर्ट मार्केट, तळ मजला, एडीआय मर्झबान स्ट्रीट, बॅलार्ड इस्टेट-४००००१.

**ताबा सूचना (कलम १३(४))**

ज्याअर्थी:
निम्नस्वाक्षरीकार यांनी कॅनरा बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (२००२ चा कायदा ५४) (यापश्चात "कायदा" म्हणून उल्लेखित) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून दि. ३१.०३.२०१८ रोजी पारित केलेल्या मागणी सूचनेद्वारे कर्जदार **मेसर्स श्री अधिकारी ब्रदर्स टेलिव्हीजन नेटवर्क लि.,** ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय अधिकारी चेंबर्स, ऑबेरॉय कॉम्प्लेक्स, न्यू लिंक रोड, अंधेरी (प), मुंबई-४०००५३ येथे आहे, त्यांच्या संचालक **श्री. मार्कंड नवनीतलाल अधिकारी** यांना सदर सूचनेमध्ये नमूद रक्कम, **रु. ५९,८६,४४,२१०.९७ (रुपये एकोणसाठ कोटी शहाऐंशी लाख चव्वेचाळीस हजार दोनशे दहा व सत्याण्णव पैसे मात्र)** सदर सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत प्रदान करण्यास सांगण्यात आले.
सदर रक्कम भरपाई करण्यास कर्जदार अयशस्वी ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी याखाली नमूद केलेल्या मालमत्तेचा सदर कायद्याच्या नियम ८ आणि ९ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून दि. २६ ऑक्टोबर, २०१८ रोजी ताबा घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना याद्वारे सूचित करण्यात येते की सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार हा कॅनरा बँकेच्या रक्कम **रु. ५९,८६,४४,२१०.९७ (रुपये एकोणसाठ कोटी शहाऐंशी लाख चव्वेचाळीस हजार दोनशे दहा व सत्याण्णव पैसे मात्र)** आणि त्यावरील व्याज एवढ्या रकमेच्या प्रभारास अधीन असेल.
गहाण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध असलेल्या वेळेच्या बाबतीत सदर कायद्याच्या कलम १३ (८) च्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेतले जात आहे.

**स्थावर मालमत्तेचा तपशील**
सीटीएस क्र. ३९९ धारण केलेला प्लॉट क्रमांक १२, एबीसीडी, गव्हर्नमेंट इंडस्ट्रीयल इस्टेट, चारकोप, कांदिवली पश्चिम, मुंबई ४०००६७ येथे स्थित मोजमाप १७६८ चौ.मीटर्स (१९०३० चौ. फूट) जमिनीचे आणि त्यावर उभ्या संरचनेचे खंड आणि तुकडे.
**सीमा :** **उत्तरेस** : औद्योगिक प्लॉट **दक्षिणेस :** पुष्पा लेन आणि प्लॉट क्र. १३
**पूर्वेस :** प्लॉट क्र. १४ **पश्चिमेस :** प्लॉट क्र. १६
**ठिकाण : मुंबई** **प्राधिकृत अधिकारी**
**दिनांक : २६.१०.२०१८** **कॅनरा बँक**



**केनरा बैंक Canara Bank**
(A Government of India Undertaking)
**विशेषज्ञ मिड कॉर्पोरेट शाखा**
मुंबई फोर्ट मार्केट, तळ मजला, एडीआय मर्झबान स्ट्रीट, बॅलार्ड इस्टेट-४००००१.

**ताबा सूचना (कलम १३(४))**

ज्याअर्थी:
निम्नस्वाक्षरीकार यांनी कॅनरा बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (२००२ चा कायदा ५४) (यापश्चात "कायदा" म्हणून उल्लेखित) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियम २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून दि. ३१.०३.२०१८ रोजी पारित केलेल्या मागणी सूचनेद्वारे कर्जदार **मेसर्स कृष्णा शोबिझ सर्व्हिसेस प्रा. लि,** ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ३-४, सुख शांती, ८ वा रस्ता, जेव्हीपीडी स्कीम, विले पार्ले (पश्चिम), मुंबई ४०० ०४९ येथे आहे, त्यांच्या संचालक **श्री. मार्कंड नवनीतलाल अधिकारी** यांना सदर सूचनेमध्ये नमूद रक्कम, **रु. ९७,४७,७४,५२२.५७ (रुपये सत्त्याण्णव कोटी सत्तेचाळीस लाख चौऱ्याहत्तर हजार पाचशे बावीस व सत्तावन्न पैसे मात्र)** सदर सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत प्रदान करण्यास सांगण्यात आले.
सदर रक्कम भरपाई करण्यास कर्जदार अयशस्वी ठरल्याने, याद्वारे कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी याखाली नमूद केलेल्या मालमत्तेचा सदर कायद्याच्या नियम ८ आणि ९ सह वाचावयाच्या सदर कायद्याच्या कलम १३ (४) अन्वये त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून दि. २६ ऑक्टोबर, २०१८ रोजी ताबा घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सर्वसाधारण जनता यांना याद्वारे सूचित करण्यात येते की सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबतचा कोणताही व्यवहार हा कॅनरा बँकेच्या रक्कम **रु. ९७,४७,७४,५२२.५७ (रुपये सत्त्याण्णव कोटी सत्तेचाळीस लाख चौऱ्याहत्तर हजार पाचशे बावीस व सत्तावन्न पैसे मात्र)** आणि त्यावरील व्याज एवढ्या रकमेच्या प्रभारास अधीन असेल.
गहाण मालमत्ता सोडविण्याकरिता उपलब्ध असलेल्या वेळेच्या बाबतीत सदर कायद्याच्या कलम १३ (८) च्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेतले जात आहे.

**स्थावर मालमत्तेचा तपशील**
सीटीएस क्र. ३९९ धारण केलेला प्लॉट क्रमांक १२, एबीसीडी, गव्हर्नमेंट इंडस्ट्रीयल इस्टेट, चारकोप, कांदिवली पश्चिम, मुंबई ४०००६७ येथे स्थित मोजमाप १७६८ चौ.मीटर्स (१९०३० चौ. फूट) जमिनीचे आणि त्यावर उभ्या संरचनेचे खंड आणि तुकडे.
**सीमा :** **उत्तरेस** : औद्योगिक प्लॉट **दक्षिणेस :** पुष्पा लेन आणि प्लॉट क्र. १३
**पूर्वेस :** प्लॉट क्र. १४ **पश्चिमेस :** प्लॉट क्र. १६
**ठिकाण : मुंबई** **प्राधिकृत अधिकारी**
**दिनांक : २६.१०.२०१८** **कॅनरा बँक**



**यूनियन बैंक ऑफ इंडिया**
अच्छे लोग, अच्छा बैंक

**मालमत्ता वसुली शाखा :** युनियन बँक बिल्डींग, ५ वा मजला, ६६/८०, मुंबई समाचार मार्ग, मुंबई- ४०००२३
**दूर :** २२६२९४५१/४५३/४६८. **संकेतस्थळ :** http//www.unionbankofindia.co.in
**ई-मेल आयडी :** arb.msm@unionbankofindia.com

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ८ (६) सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन ॲंड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियाल ॲसेट अंड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या वसुलीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

साधारणपणे सर्व जनतेला आणि विशेषत: कर्जदार (राना) आणि हमीदार(राना) ह्यांना ख्याद्वारे सूचना देण्यात येते की खाली नमूद स्थावर मालमत्ता सुरक्षित ऋणको ह्यांच्याकडे गहाण ठेवण्यात आल्या असून त्यांचा प्रत्यक्ष ताबा युनियन बँक ऑफ इंडिया, मालमत्ता वसुली शाखा, मुंबई, प्राधिकृत अधिकारी ह्यांच्याद्वारे घेण्यात आला असून त्यांची विक्री **''जशी आहे जेथे आहे'', ''जसे आहे तसे आहे'' आणि ''जेथे आहे तेथे आहे''** ह्या तत्वावर **१५.११.२०१८** रोजी खाली नमूद करण्यात आलेल्या संबंधित कर्जदार (दारां) आणि हमीदार (दारां) कडे थकीत असलेल्या युनियन बँक ऑफ इंडिया (सुरक्षित ऋणको) च्या थकीत रकमेच्या वसुलीसाठी करण्यात येणार आहे. राखीव मूल्य आणि इसारा रक्कम खाली नमूद करण्यात आल्या प्रमाणे असेल.

विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींसाठी कृपया युनियन बँक ऑफ इंडिया (सुरक्षित ऋणको)च्या संकेतस्थळावर म्हणजेच **www.unionbankofindia.co.in** किंवा **www.tenders.gov.in** वर देण्यात आलेल्या लिंक वर उपलब्ध असून त्यांचा संदर्भ घ्यावा.

खाली नमूद करण्यात आलेल्या मालमत्तांची **''ऑनलाईन ई-लिलावा''**द्वारे १५.११.२०१८ रोजी संबंधित खात्यांमधील नमूद रक्कम अधिक व्याज आणि खर्चाच्या वसुलीसाठी करण्यात येणार आहे.

| लॉट क्र. | कर्जदार आणि गहाणदाराचे नाव | लिलाव करण्यात येणारी मालमत्ता | लिलावाचा दिनांक आणि वेळ | इसारा रक्कम ठेव (इरठे) | बोली सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक | राखीव मूल्य | बोली वाढविण्याची रक्कम | व्याजासह थकीत रक्कम आणि मूल्य | इच्छुक खरेदीदारासाठी मालमत्तेच्या पाहणीसाठी दिनांक आणि वेळ | बँकेला ज्ञात असलेला मालमत्तेवरील बोज्याचा तपशिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **मे. लक्ष्मीनारायण डाळ ॲंड बेसन मिल, श्री. मनोहर जोधामाल हर्चवानी** | सदनिका क्र. १०२, १ ला मजला, शांती प्रभू आस्था इमारत, प्रेम नगर टेकडी, आर. क्र. १५२७-१५२८, ब्लॉक क्र. ए-७६४, एस. क्र.५५, उल्हासनगर - ४२१००५ | १५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत) | रु. ४,९५,०००.०० | १४.११.२०१८ | रु. ४९,५०,०००.०० | रु. ५०,०००.०० | ३०.०९.२०१८ अनुसार रु. १,२७,११,३०७.९७ | ०५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून ०१.०० वा. पर्यंत) | ज्ञात नाही |
| २ | **मे. जेम स्टार कंपनी प्रा. लि., मे. निखील जेम्स, श्रीपाल परसन मणिलाल** | सदनिका क्र. १३, ३ रा मजला, बी विंग, नगीनदास मन्शन कॉ.ऑप.हौ. सो.लि., ५७-६१, जगन्नाथ शंकर शेठ रोड, ओपेरा हाऊस, मुंबई - ४००००४ | १५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत) | रु. २५,२०,९००.०० | १४.११.२०१८ | रु. २,५२,०९,०००.०० | रु. ५०,०००.०० | ३०.०९.२०१८ अनुसार रु. ५०,९४,६३,६०८.०० | ०५.११.२०१८ (स. ०३.०० वा. पासून ०५.०० वा. पर्यंत) | ज्ञात नाही |
| ३. | **मे. राहुल ग्रॅफाईट लि., श्री. राम स्वरूप उपाध्याय, श्रीमती विजयालक्ष्मी उपाध्याय, मे. राहुल इम्पेक्स, मे. राहुल इंटरप्रायझेस, मे. राहुल इंडस्ट्रीज, रेफेक्टोरिज ॲंड कंट्रोल कॉर्पोरेशन** | राहुल वे ब्रिज, धारण केलेला एस. क्र. ७६, एच. क्र. ४ (पैकी), अंजूर-भिवंडी रोड, मौजे दापोडे, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे | १५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत) | रु. १५,४७,१००.०० | १४.११.२०१८ | रु. १,५४,७१,०००.०० | रु. ५०,०००.०० | ३०.०९.२०१८ अनुसार रु. ४८,१६,२५,७०६.७० | १२.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून ०१.०० वा. पर्यंत) | ज्ञात नाही |
| ४. | **मे. राहुल ग्रॅफाईट लि., श्री. राम स्वरूप उपाध्याय, श्रीमती विजयालक्ष्मी उपाध्याय, मे. राहुल इम्पेक्स, मे. राहुल इंटरप्रायझेस, मे. राहुल इंडस्ट्रीज, रेफेक्टोरिज ॲंड कंट्रोल कॉर्पोरेशन** | सदनिका क्र. ३०२, ३ रा मजला, 'बी' विंग, सबिना अपार्टमेंट, सबिना सीएचएस लि., सीटीएस क्र. ३०० आणि ३०१, एस.एन.क्र. ३/२ आणि ३, प्लॉट क्र.७ आणि ८, गाव मोहिली हिमालय सोसा. जवळ, एन.एस.एस. रोड, असल्फा, घाटकोपर (प), मुंबई | १५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत) | रु. ४,९१,२५०.०० | १४.११.२०१८ | रु. ४९,१२,५००.०० | रु. ५०,०००.०० | ३०.०९.२०१८ अनुसार रु. ४८,१६,२५,७०६.७० | १२.११.२०१८ (स. ०३.०० वा. पासून ०५.०० वा. पर्यंत) | ज्ञात नाही |
| ५. | **मे. ओशिया इंडस्ट्रीज प्रा. लि. श्री. विजेंद्र रांका, श्री. संतोष कुमार रांका, श्री. योगेश सरस्वते** | बिगर शेत जमिनीचा प्लॉटचा धारण केलेला गट क्र. ८४४, गाव सणसवाडी, तालुका- शिरूर, जिल्हा पुणे जो श्री. योगेश सरस्वते ह्यांचा नावे आहे. | १५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत) | रु. ३४,६८,६००.०० | १४.११.२०१८ | रु. ३,४६,८६,०००.०० | रु. ५०,०००.०० | ३०.०९.२०१८ अनुसार रु. ४२,०५,८६,५८१.९१ | १२.११.२०१८ (स. ०१.०० वा. पासून ०३.०० वा. पर्यंत) | ज्ञात नाही |
| ६ | **मे. ओशिया इंडस्ट्रीज प्रा. लि. श्री. विजेंद्र रांका, श्री. संतोष कुमार रांका, श्री. योगेश सरस्वते** | औद्योगिक जमिनीचा धारण केलेला गट क्र. १३९८, १४०० ते १४०५, १४०७ ते १४१३, १५५५, १५५६, मिल्टन प्लास्टिकस लिमिटेड समोर, पुणे नगर रोड, गाव शिखरापूर, तालुका शिरूर, जिल्हा- पुणे | १५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत) | रु. ३३,८६,६००.०० | १४.११.२०१८ | रु. ३,३८,६६,०००.०० | रु. ५०,०००.०० | ३०.०९.२०१८ अनुसार रु. ४२,०५,८६,५८१.९१ | १२.११.२०१८ (स. १०.०० वा. पासून १२.०० वा. पर्यंत) | ज्ञात नाही |
| ७. | **मे. नफिसा रोडवेज, मे. नफिसा वेअरहाऊसिंग, श्री. अयुब इदू खान** | प्लॉट क्र. १०१५ आणि १०१६, रोड क्र. ११, स्टील यार्ड, Vill कळंबोली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड | १५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत) | रु. ८,१२,३००.०० | १४.११.२०१८ | रु. ८१,२३,०००.०० | रु. २५,०००.०० | ३०.०९.२०१८ अनुसार रु. २,२४,२८,९७९.८१ | ०६.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ०१.०० वा. पर्यंत | ज्ञात नाही |
| ८. | **मे. प्राईम इंटरप्रायझेस, श्री. पियुष एन. मेहता, श्रीमती कुमुद्बेन मेहता** | कार्यालय क्र. ३०३, ३ रा मजला, नैनकृपा कॉ-ऑप सोसायटी लि., काजी सैय्यद स्ट्रीट, प्लॉट क्र. ११८/१२२, युनियन बँकेजवळ, मस्जिद बंदर (प), मुंबई - ४००००३ | १५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत) | रु. २,३२,३००.०० | १४.११.२०१८ | रु. २३,२३,०००.०० | रु. २५,०००.०० | ३०.०९.२०१८ अनुसार रु. ४,९८,९७,४७४.९७ | ०६.११.२०१८ (दु. ०३.०० वा. पासून ०५.०० वा. पर्यंत | ज्ञात नाही |
| ९. | **मे. शिवमिल्क प्रॉडकट, श्री. कपिल डी. राजपूत, श्री. मिथिलेश राजपूत, श्री. मुरुगेसन आदीमूलम, श्री. हेमल जोबनपुत्र** | गट क्र. ३३१/२/१, कोपरगाव रोड, कसबे वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद येथील कारखान्याची इमारत आणि जमीन. | १५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत) | रु. ३,५७,२००.०० | १४.११.२०१८ | रु. ३५,७२,०००.०० | रु. २५,०००.०० | ३०.०९.२०१८ अनुसार रु. १३,२१,१४,४२१.३० | ०५.११.२०१८ (दु. १२.०० वा. पासून दु. ०२.०० वा. पर्यंत) | ज्ञात नाही |
| १०. | **शिवनेरी पशु पक्षी खाद्य उद्योग, श्री. रवींद्र रामण्णा परशुराम एफ, श्री. माधवजी भानुशाली** | प्लॉट क्र. बी-१-२८,३२-३६, ४० गाव कांडली इंडस्ट्रीयल इस्टेट, नारायणगाव, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे | १५.११.२०१८ (स. ११.०० वा. पासून दु. ३.०० वा. पर्यंत) | रु. १७,३१,४००.०० | १४.११.२०१८ | रु. १,७३,१४,०००.०० | रु. ५०,०००.०० | ३०.०९.२०१८ अनुसार रु. २,७४,०७,६५१.४८ | ०९.११.२०१८ रोजी (दु. १२.०० वा. पासून दु. ०२.०० वा. पर्यंत) | ज्ञात नाही |

राखीव मूल्याच्या परतावा योग्य इरठेची रक्कम इच्छुक बोलीदारांनी एनईएफटी/ आरटीजीएस द्वारे १४.११.२०१८ रोजी किंवा त्यापूर्वी खाते क्र. **५३३५०१९८००५००००, युनियन बँक ऑफ इंडिया, मालमत्ता वसुली शाखा, एम.एस. मार्ग, मुंबई, आयएफएससी कोड यूबीआयएन०५५३३५२** द्वारे किंवा मुंबई येथे देय असलेल्या युनियन बँक ऑफ इंडिया, मालमत्ता वसुली शाखा, एम.एस.मार्ग, मुंबई ह्यांच्या नावे असलेल्या डीडी/ पे ऑर्डर द्वारे जमा करावे.

बोलीदार संकेतस्थळ **http://ubi.auctiontiger.net** ला भेट देता येईल किंवा सेवा पुरवठादार मे. ई-प्रोक्युरमेंट टेकनॉलॉजीस लि. (ऑक्शन टायगर), अहमदाबाद (संपर्क क्र. ०७९-४०२३०८४१/८४४/८०६/८१३/८१६/८१८/८१४ वर संपर्क करता येईल. संपर्कासाठी व्यक्ती: श्री. टिळक मराठे, मोबा क्र.: ०९०६७७९९६४६ ई-मेल आयडी : **maharashtra@auctiontiger.net** श्री. विजय शेट्टी, मोबा क्र.: ०९६१९००२४३१. ऑनलाईन लिलावामध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक बोलीदाराकडे वैध ई-मेल असणे गरजेचे आहे.

इच्छुक बोलीदार **प्राधिकृत अधिकारी** श्री. डी.बी. जैस्वार (९९३०११६०८०), श्री. व्ही.बी. शेरखाने (९८८१९८९४३०), युनियन बँक ऑफ इंडिया, ५ वा मजला, मालमत्ता वसुली शाखा, मुंबई समाचार मार्गं, मुंबई आणि लिलावाचा तपशिल निश्चित करण्यासाठी आणि उपरोक्त नमूद केल्या प्रमाणे मालमत्तांची पाहणी करण्यासाठी संपर्क क्र. +९१ २२ २२६२ ९४५१/४५३/४६८, ई-मेल आयडी : **arb.msm@unionbankofindia.com** वर मेल पाठवून संपर्क करता येईल.

ठिकाण : मुंबई **प्राधिकृत अधिकारी**
दिनांक : २६.१०.२०१८ **युनियन बँक ऑफ इंडिया**